# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ८८५

दिनांक : 29 JUL 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

**विषय :-** प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदवी व फार्म डी. अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे रिपोर्टिंग करण्यासाठी मुदतवाढीबाबत...

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदवी व फार्म डी. अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिस-या फेरीमध्ये अलॉट झालेले प्रवेश संबंधित विद्यार्थ्यांने काही कारणास्तव प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) निश्चित केले नाहीत . प्रवेश ॲलॉट झालेल्या उमेदवारांना एआरसी मध्ये प्रवेश निश्चिती करण्यासाठी अनुक्रमे अभियांत्रिकी अभ्यासक्रमांकरिता दिनांक २८.७.२०१७ आणि आणि औषधनिर्माणशास्त्र / Pharm D या अभ्यासक्रमांसाठी दिनांक २५.७.२०१७ अशी अंतिम मुदत होती. या विहीत मुदतीत जे उमेदवार प्रवेश निश्चिती करू शकले नाहीत अशा उमेदवारांना प्रवेशाची संधी मिळावी या हेतूने प्रवेशाचे रिपोर्ट करण्यासाठीची **अंतिम मुदत दिनांक ३०.७.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत वाढविण्यात येत आहे**. तथापि उमेदवारांना प्रवेश निश्चितीसाठी त्यांना ज्या विभागातील संस्थेत प्रवेश ॲलॉट झाले आहेत त्या संबंधित विभागीय कार्यालयात उपस्थित राहून विहीत सीट ॲक्सेप्टन्स शुल्क भरून प्रवेश निश्चिती करता येऊ शकेल.

तसेच यापूर्वी प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदवी व फार्म डी. अभ्यासक्रमासाठी पहिल्या आणि दुस-या केंद्रीभूत प्रवेश फेरीत प्रवेश ॲलॉट झाला असेल व उमेदवारांनी तो प्रवेश निश्चिती केंद्रावर जाऊन प्रवेश निश्चित केला नसेल तर अशा प्रकरणी उमेदवारांना त्यांना latest ॲलॉट करण्यात आलेल्या संबंधित संस्थेत सदय:स्थितीत त्याच seat type वर जागा रिक्त असतील तर ज्या विभागातील संस्थेत प्रवेश ॲलॉट झाले आहेत त्या संबंधित विभागीय कार्यालयात उपस्थित राहून दिनांक ३०.७.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विहीत सीट ॲक्सेप्टन्स शुल्क भरून प्रवेश निश्चिती करता येऊ शकेल.ही सुविधा प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर असेल.

अशा प्रकारे प्रवेश निश्चिती केलेल्या उमेदवारांना संबंधित संस्थेत आवश्यक कागदपत्रे आणि उर्वरीत शुल्क भरण्यासाठी दिनांक ३१.७.२०१७ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत रिपोर्टिंग करणे बंधनकारक असून त्यानंतर शासकीय आणि शासन अनुदानीत संस्थांमधील रिक्त जागांसाठीची अतिरिकत् प्रवेश फेरीसाठी उपलब्ध जागा दिनांक ३१.७.२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात येतील.

विभागीय कार्यालयांना प्रवेश निश्चिती करण्यासाठी संस्थांमधील रिक्त जागांची माहिती संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी उपरोक्त कालावधीत उमेदवारांना प्रवेश निश्चिती करता यावी या दृष्टीकोनातून सर्व विभागीय कार्यालयांचे कामकाज सुरू ठेवण्यात यावे .

( दयानंद मेश्राम )

सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

E:\Budage\2017-18\General Correspondence\extension for admission confirmation BE B.Pharm Pharm D.docx